# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः08.08.2024** **वारःगुरुवार**

---

1. महाराष्ट्र लॉजिस्टीक धोरणास राज्य मंत्रीमंडळाची मान्यता; नवी मुंबई-पुणे भागात आंतरराष्ट्रीय (मेगा) लॉजिस्टिक केंद्राची उभारणी
2. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाद्वारे पावणेचार लाख हेक्टर क्षेत्रावर सिंचनाचे नियोजन
3. राज्यसभेच्या राज्यातल्या 2 जागांवर होणाऱ्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर आणि,
4. कुस्तीपटू विनेश फोगाट काही ग्रॅम अतिरिक्त वजनामुळे पॅरिस ऑलिंपिकच्या पदकापासून वंचित

**मंत्रीमंडळ**

महाराष्ट्र लॉजिस्टीक धोरण-2024 ला काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. पुढच्या 10 वर्षांचा विकास लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या धोरणामुळे राज्यात सुमारे 5 लाख इतकी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. तसंच यातून सुमारे 30 हजार 573 कोटी रुपये उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. यामध्ये नवी मुंबई-पुणे क्षेत्रात 2 हजार एकर जागेवर आंतरराष्ट्रीय (मेगा) लॉजिस्टिक हब तयार करण्यात येणार असून विविध ठिकाणी मध्यम आणि लघु केंद्रं उभारली जातील. या सर्व केंद्रांमध्ये अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्याचं नियोजन आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले. वैनगंगा - नळगंगा या महत्वाकांक्षी नदीजोड प्रकल्पाला काल झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन निर्माण करून या भागातल्या शेतीला समृद्ध करणारा हा प्रकल्प आहे. यासाठी 87 हजार 342 कोटी 86 लाख रुपये खर्च होणार असून पावणेचार लाख हेक्टर क्षेत्रावर सिंचन होणार आहे.

हर घर तिरंगा हे अभियान उद्यापासून 15 ऑगस्टपर्यंत राज्यात राबवण्यात येणार आहे. काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. उद्याच्या ऑगस्ट क्रांतीदिनी मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून ह्या कार्यक्रमाचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात येणार आहे. सुमारे अडीच कोटी घरे आणि आस्थापनांवर तिरंगा फडकविण्यात येणार आहे. तसंच तिरंगा यात्रा, फेरी, स्पर्धा, तिरंगा सेल्फी अशा विविध माध्यमातून कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार आहे.

प्रकल्पबाधितांना सदनिका उपलब्ध करून देण्याच्या धोरणास कालच्या बैठकीत मान्यता आली असून लहान शहरांत पायाभूत सुविधांना वेग देण्यासाठी कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध करून देण्यासही मान्यता देण्यात आली आहे. आदिवासी विभागातल्या प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षे मुदतवाढ देण्याचा निर्णयही काल घेण्यात आला. ही मुदतवाढ केवळ एक वेळची बाब म्हणून देण्यात येत आहे.

अनुसूचित जाती जमातीच्या जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्यातल्या अडचणी दूर करण्यासाठी महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग विशेष मागास प्रवर्ग नियमन यामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. राज्यातल्या अल्पसंख्याक बांधवांचं मागासलेपण दूर करुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अल्पसंख्याक संशोधन आणि प्रशिक्षण संस्था म्हणजे 'एमआरटीआय'ची स्थापना करण्याचा निर्णय काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्यातल्या कागल इथं आयुर्वेद महाविद्यालय आणि आजरा तालुक्यात उत्तूर इथं योग आणि निसर्गोपचार महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णयही काल घेण्यात आला.

**प्रशिक्षण-पालघर**

युवावर्गाला शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचं प्रशिक्षण देण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवण्यात येत आहे. शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाकडून राबवण्यात येत असलेल्या या योजनेचा कालावधी 6 महिन्यांचा असून या अंतर्गत प्रशिक्षणार्थींना विद्यावेतनही देण्यात येणार आहे. बारावी, पदविका, पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या युवक युवतींना महास्वयम संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

**पोट निवडणूक**

देशातल्या 9 राज्यांतल्या 12 जागांसाठी होणाऱ्या राज्यसभेच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम काल निवडणूक आयोगानं जाहीर केला. राज्यातल्या 2 जागांचा यात समावेश आहे. या पोटनिवडणुकीसाठी या महिन्याच्या 14 तारखेला अधिसूचना जारी होईल. 22 तारखेला अर्जांची छाननी होईल. 3 सप्टेंबरला मतदान होणार आहे. राज्यात खासदार उदयनराजे भोसले आणि पियुष गोयल लोकसभेवर निवडून गेल्यामुळे दोन जागांवर पोटनिवडणूक होणार आहे.

**मतदार पुनरिक्षण-धुळे, सातारा, चंद्रपूर**

पात्र उमेदवारांची नावं वगळली जाऊ नयेत आणि सर्व मतदारांची नावं यादीत समाविष्ट व्हावीत, यासाठी राज्यातल्या विविध जिल्ह्यात मतदार याद्यांचा दुसरा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मतदारांच्या प्रारूप याद्या तयार करण्यात येत असून त्या सर्वांना निरीक्षणासाठी प्रसिद्ध करण्यात येत आहेत. तर या संदर्भातले दावे आणि हरकती 20 ऑगस्ट पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत.

**हातमाग**

हातमागाच्या उत्पादनांना गतवैभव मिळवून देण्यासाठी त्यांचं विपणन योग्य रीतीनं होण्याची गरज खादी आणि ग्रामोद्योग महामंडळाचे केंद्रीय सदस्य जयप्रकाश गुप्ता यांनी काल नागपूरमध्ये व्यक्त केली. राष्ट्रीय हातमाग  दिवसानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. नागपूरच्या तांडापेठ, धापेवाडा आणि अकोला येथील बाळापूर येथे 3 हातमाग क्लस्टरची निर्मिती करण्यात आली असून या मार्फत हातमागचे उत्पादन चालू आहे अशी माहिती विणकर सेवा केंद्र नागपूर कार्यालयाचे उपसंचालक संदीप ठुबरीकर यांनी दिली. यावेळी हातमाग वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आलं. तसंच केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयातर्फे हातमाग क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार मिळालेल्या विणकारांचा सत्कार करण्यात आला.

**आदिवासी महोत्सव-नंदुरबार**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून भरवल्या जाणाऱ्या आदिवासी महोत्सवाला काल नंदुरबारमध्ये सुरवात झाली. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसात

राज्यातल्या आदिवासी कला पथकांमध्ये नृत्य स्पर्धा रंगते आहे. आदिवासी बचत गटांच्या उत्पादनांच्या विक्रीची दालनंही आकर्षणाचा विषय आहे.

**स्मार्ट प्रीपेड एनर्जी मीटर**

केंद्र सरकारच्या स्मार्ट प्रीपेड एनर्जी मीटर या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत देशभर बसवण्यात येणाऱ्या सुमारे 27 कोटी स्मार्ट मीटरपैकी अंदाजे 6 कोटी मीटर पुण्यातील मराठवाडा मित्र मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्टार्ट अप इन्क्युबेशन सेंटर मध्ये तयार होणार आहेत. या संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष भाऊसाहेब जाधव आणि या सेंटर्सशी संबंधित अन्य पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत याबद्दलची घोषणा केली. ऐकू या त्याबद्दलचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून....

**देशभरातील स्टार्टअप उद्योगाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून स्मार्ट प्रीपेड एनर्जी मीटर हा राष्ट्रीय कार्यक्रम देशभर राबवला जात असून त्यासाठी एकंदर 27 कोटी स्मार्ट मीटरची गरज भासणार आहे. त्यापैकी तब्बल 6 कोटी स्मार्ट मीटर पुण्यातील मराठवाडा मित्र मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्राच्या मदतीनं सुरु केलेल्या इन्क्युबेशन सेंटरकडून बनवले जाणार आहेत. त्यासाठी त्यांना सुमारे 20 कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळाली आहे. पुण्याजवळील चाकण परिसरात हे मीटर बनवले जाणार असून त्यामुळं विजेची चोरी मोठ्या प्रमाणावर रोखली जाईल शिवाय हे प्रीपेड मीटर असल्यानं वीज बिलाच्या थकबाकीचा प्रश्न देखील कायमचा निकालात निघणार आहे. स्मार्ट मीटरच्या या उत्पादनानंतर पुण्यातील स्टार्टअप उद्योगाला देखील नवी ऊर्जा मिळण्याची शक्यता आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून विनायक सोमणी.**

**भंडारा-पोषण आहार**

भंडारा जिल्ह्याच्या चांदपूर गावात शालेय विद्यार्थ्यांना मुदत संपलेला पोषण आहार दिला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या बाबतीतला अहवाल गट शिक्षणाधिकारी यांना देण्यात असून त्यांनी तो जिल्हा शिक्षण विभागाला पाठविला आहे. या प्रकराणाची सखल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल असं शिक्षणाधिकारी यांनी सांगितलं.

**ऑलिंपिक**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये काल भारताला मोठा धक्का बसला. कुस्तीपटू विनेश फोगाट हिला वजन अधिक भरल्यामुळे ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्यात आलं. अंतिम फेरीच्या आधी तिचं वजन काही ग्रॅमनं अधिक भरल्यामुळे ही कारवाई करण्यात आली. दरम्यान, भारतीय ऑलिम्पिक संघटनेनं या निर्णयाचा निषेध संयुक्त जागतिक ऑलिम्पिक संघटनेकडे नोंदवल्याची माहिती क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी काल लोकसभेत दिली.

अपात्र ठरल्यानंतर अत्यंत निराश असलेल्या विनेशबद्दल सर्व भारतीयांनी सहवेदना प्रदर्शित केली असून देशाला तिचा अभिमान असल्याची भावना व्यक्त केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही विनेशच्या कामगिरीचं कौतुक केलं असून ती सर्व भारतीयांसाठी आणि विशेषत: महिलांसाठी प्रेरणा असल्याचं म्हटलं आहे.

पॅरिस ऑलिंपिकमध्ये महिलांच्या टेबल टेनिस सांघिक उपांत्यपूर्व फेरीत काल भारताला जर्मनीकडून पराभव पत्करावा लागला. ऑलिंपिकमध्ये आज भालापटू निरज चोप्रा अंतिम फेरीतल्या भालाफेकीसाठी मैदानात उतरेल. तर पुरुष हॉकी संघाचा सामना कांस्य पदकासाठी स्पेनबरोबर होईल.

**हवामान**

राज्याच्या विविध भागातला पावसाचा जोर काहीसा कमी झाला असला तरी अनेक भागात पावसाच्या सरी कोसळत आहेत. उद्या पर्यंतच्या हवामानाच्या अंदाजानुसार कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडासह जोरदार पाऊस पडेल. मराठवाड्यात हलक्या पावसाची शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार**